


दुपारी १२.०० - तिकीट १५०/१३०
दुपारी ०३.०० - तिकीट १८०/१६०
रात्री. ०९.०० - तिकीट १८०/१६०




सकाळी १२.३० - तिकीट १५०/१३०


## प्राधिकृत प्रकाशन
## मुख्याधिकारी नगरपंचायत वाभवे-वैभववाडी
## जाहीर प्रसिद्धीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ दि. २८/४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सार्वजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करुन त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपरिषद या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नगरपंचायत वाभवे-वैभववाडी मार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू असलेल्या व अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ २०१५/प्र.क्र.१८९/नवि १४ दिनांक २३/०६/२०१५ नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

मा. शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकूण ७० सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु त्यापैकी ०५ सेवा या फक्त महानगरपालिकेकरिता लागू असल्याने व पाणी पुरवठा विषयक १४ सेवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत देण्यात येत असल्यामुळे नगरपंचायत वाभवे-वैभववाडी नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या ५१ इतकी होते. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ अन्वये सदर ५१ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची यादी सोबत जोडली आहे.

सही/-

(शिक्का)

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत वाभवे-वैभववाडी**